# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2013)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. (०२२) २६४७१२५५ (का.) फॅक्स क्र. (०२२) २६४७३९८०

Email : director@msbte.com Web : www.msbte.org.in


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/Live Counseling/२०१९/५७ दिनांक - 4 JUN 2019

**महत्वाचे**

प्रति,

प्राचार्य, सर्व AICTE Approved अभियांत्रिकी पदविका संस्था

**विषय : " अभियांत्रिकी पदविका — समुपदेशन २०१९ "**

संदर्भ : मंडळाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५०/समुपदेशन कक्ष/२०१९-२०/३१०० दि.७/५/२०१९

राज्यातील विद्यार्थी व पालक यांना सुयोग्य मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने प्रत्येक तंत्रनिकेतनामध्ये एक समुपदेशन कक्ष स्थापन करण्यासाठी आवश्यक सूचना उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये सर्व AICTE Approved पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने बुधवार दि. १२-६-२०१९ रोजी " **अभियांत्रिकी पदविका — समुपदेशन २०१९**" हा कार्यक्रम स. १०.०० ते दु. २.०० वाजेपर्यंत मुंबई वरुन Live Broadcast करण्यात येईल. या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र राज्यातील अग्रगण्य उद्योजक हे इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यांना मार्गदर्शन करुन त्यांच्या शंकांचे Live निराकरण करतील.तसेच पदविका प्रवेश बद्दल सुध्दा मार्गदर्शन करण्यात येईल. कार्यक्रमासाठी राज्यातील प्रत्येक तंत्रनिकेतनाच्या Counseling Cell मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी व पालकांनी सहभागी व्हावे म्हणून विभागीय स्तरावर व संस्थास्तरावर वर्तमानपत्रात बातमीच्या माध्यमातून प्रचार व प्रसार करण्यात यावा. तसेच Hand Bills, Posters, Local Cable Operators इ.च्या माध्यमातूनही सदर कार्यक्रमाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्यात यावा. सदर कार्यक्रमासाठी लागणारे तांत्रिक मनुष्यबळ व साधनसामग्रीबद्दलची माहिती RBTE मार्फत संबंधित संस्थांना देण्यात येईल. सदर कार्यक्रमासाठी Co-ordinator म्हणून निवडलेल्या संस्थेच्या माध्यमातून MSBTE, RBTE व Polytechnics यांच्या मध्ये समन्वय साधण्यात येईल व यासंबंधी संस्थांना वेळोवेळी RBTE व Co-ordinators यांचेमार्फत सूचना देण्यात येतील.

तसेच सदर कार्यक्रम झाल्यावर विद्यार्थी व पालकांना अधिक माहितीसाठी मंडळामार्फत प्रकाशित झालेली माहितीपत्रकांचे विनामूल्य वाटप करण्यात यावे.

**( डॉ. विनोद म. मोहितकर )**

संचालक

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत : उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी

*D/Bhadekar/Counseling cell*